Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 775 – 779
DOI: 10.5281/zenodo.10279772

Original Research Article

# महात्मा गांधींच्या सर्वोदयी संकल्पनेची गरज

प्रा. डॉ. यशवंत वळवी

विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर ४१३५१२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: yashvalvi525@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

मानवाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी समाजाची आवश्यकता आहे. कारण समाजाशिवाय मानवी प्रगती होऊ शकत नाही. थोर पुरुषांच्या विचारांमुळे विश्वपातळीवर बदल घडून आलेला दिसून येतो. भगवान गौतम बुद्धांनी मानवी जीवन प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे त्यांनी राजदरबार सोडला. हे ऐतिहासिक पुराव्यामुळे निदर्शनास येते. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, बेंथम या विविध विचारवंतांनी समाजाच्या विकासासाठी आणि मानवाच्या विकासासाठी मुक्त स्वातंत्र्य असावे, असे सूचित केले आहे. जसे प्लेटो ॲरिस्टॉटल यांनी आदर्श राज्याची संकल्पना सांगितली आहे; त्यात आदर्श समाज, आदर्श नागरिक, आदर्श राज्य यातून दिसून येते. मानवी जीवन सुखी, समाधानी होण्यासाठी नीतिमत्ता हा घटक महत्त्वाचा असल्याचे दिसते.

महात्मा गांधींच्या मनावर सर्वोदय विचार अधिक रूजला. अधिकाधिक लोकांचे सुख हा विचार बेंथम यांनी मांडला. हा मानवतावादी विचार डोळ्यासमोर ठेवून संकुचित भावनेचा त्याग करणे, सर्वधर्म, जातीचा, वर्णाचा विकास घडवून आला पाहिजे, असा अर्थ यातून निघतो. व्यक्ती विकासासाठी पूर्ण स्वातंत्र्य, मुक्त मुभा असावी, त्याशिवाय विकास अशक्य आहे. समाजवाद, साम्यवाद या संकल्पनेपेक्षा सर्वोदय ही संकल्पना व्यापक स्वरूपाची आहे. हा विचार राष्ट्रीयते ऐवजी विश्वबंधुत्वासाठी प्रयत्न करण्याचा संदेश देतो. समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधींनी या विचारांचा स्वीकार केलेला आहे.

रस्किनच्या ***'An To This Last'*** या ग्रंथाचा गांधीजींच्या जीवनावर फार मोठा प्रभाव दिसून येतो. गांधीजींनी या ग्रंथांचे गुजराती भाषेत रूपांतर केले. या पुस्तकाच्या नावात विशिष्ट असा अर्थ दडलेला आहे. येशू ख्रिस्त आपल्या

शिष्यांना प्रसाद देताना म्हणाले होते की, हा शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवा. मानवी जीवनाच्या फायद्यापासून कोणतीही व्यक्ती वंचित राहता कामा नये, असा घेऊन त्यावर आपल्या विचारांची गांधीजींनी उभारणी केली.

गांधीजींनी त्याचे भाषांतर 'सर्वोदय' असे केले. सर्वांचा उदय म्हणजे सर्वांचा विकास एकाच वेळी व्हावा आणि मानवी प्रगतीचा लाभ सर्वांना एकदाच मिळावा. समाजाचे संपूर्ण कल्याण साधण्यासाठी भौतिक, आर्थिक, आध्यात्मिक साधनांवर त्यांनी भर दिला. गांधीजी समानतेला सर्वोदयाचा आधार मानतात. सर्वांच्या विकासासाठी, सुखासाठी व्यक्तीने त्यागास तत्पर असले पाहिजे, हा संदेश ते देतात. महात्मा गांधींच्या सर्वच विचारांना नीतिमत्तेची जोड आहे. सत्य, अहिंसा, सत्याग्रह, विश्वस्त, रामराज्य, नवसमाज या सर्व तत्त्वप्रणालीला नीतिमत्तेची ताकद असल्याचे दिसून येते.

गांधीजींनी जी सर्वोदय संकल्पना मांडली किंवा समाजव्यवस्था अशा पद्धतीने असावी, असे स्वप्न बघितले किंवा पाहिले. त्यात मानवी समूहाने तंतोतंत काळजीपूर्वक नियमांचे पालन केले तर परिस्थिती तशी अस्तित्वात येऊ शकते. त्यासाठी स्वार्थ, लाभ, लालसा, लोभ बाजूला सारल्यास सर्वकाही होऊ शकते. सर्वांचे कल्याण साधणारी ही आदर्श समाजव्यवस्था आहे. सर्वव्यापी प्रेम हा ह्या नव्या समाजव्यवस्थेचा पाया आहे. या व्यवस्थेत कोणाचाही भेद न करता सर्वांना समान स्थान राहील. कोणत्याही व्यक्तीची अथवा गटाची पिळवणूक होणार नाही. कोणाचेही शोषण व कोणावर दडपण राहणार नाही.

सर्वोदयी समाजात प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या श्रमातून निर्माण केलेल्या उत्पादनाचा उपभोग घेईल. सबल, दुर्बलांचे संरक्षण करतील. दुर्बलांचे विश्वस्त म्हणून काम पाहतील व प्रत्येक व्यक्ती सर्वांचे कल्याण साधण्यासाठी झटण्यास तत्पर राहील. मानवी जीवन सुखी होण्यासाठी जगाने हे तत्त्व अंगीकारले तर मानवी जीवनात कोणत्याही ठिकाणी भेद, संघर्ष, हिंसा, अतिरेक, स्वार्थ, लबाडी किंवा स्पर्धेतून तयार होणारे विध्वंसक वातावरण दिसून येणार नाही. म्हणून जगाला महात्मा गांधींचे सर्वोदयी विचार आजही लाभदायी आहेत, असे मला वाटतं. तसेच हे सर्वोदयी विचार पुढेही चिरकाल स्वरूपाचे असतील, हे अंतिम सत्य आहे.

**सर्वोदयी संकल्पना अर्थ**

अहिंसात्मक मार्गाने सर्वांचे कल्याण साधणारी चळवळ यालाच 'सर्वोदय' असे म्हणतात. जातिभेद व पिळवणूक यांना थारा नसलेली व सर्वांचा विकास, कल्याण साधणारा आणि सत्य, अहिंसा, साधनसूचिता याच्या पायावर उभा असलेला नवासमाज य'सर्वोदय' असे म्हणता येते.

**सर्वोदयाची आधारभूत तत्त्वे**

समाज हितात व्यक्तीचे हित असते, समाजाला हितकारक असे कोणतेही काम वाईट किंवा कमी दर्जाचे नसते. तसेच समाजासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कामांचे मूल्य सारखेच असते. स्वतःच्या श्रमावर जगणे यासारखे सुखी जीवन दुसरे नाही. रस्किनने आपल्या या सूत्रात सामाजिक कल्याण, समता, श्रमाची प्रतिष्ठा याचे महत्त्व सांगितलेले आहे. तर गांधीजींनी या सूत्रांच्या आधारे आपले तत्त्वज्ञान मांडलेले आहे.

- सर्वांच्या कल्याणातच व्यक्तीचे कल्याण आहे.
- न्हावी आणि वकील यांच्या कामाची किंमत सारखीच असते.
- सुखी जीवन म्हणजे स्व काष्टार्जित जीवन ही सर्वोदयी आधारभूत तत्त्वे आहेत.
- मनुष्य स्वभाव निसर्गत: चांगला आहे. सर्व माणसे हृदयाने चांगली असतात.

हे सर्वोदयाचे आधारभूत तत्त्वे मानले. त्याबरोबर सत्य आणि अहिंसा या तत्त्वांनाही महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. त्यांनी सर्वोदय हे जीवनविषयक तत्त्वज्ञान मानले.

**सर्वोदयाची उद्दिष्ट्ये**

सर्वोदय संकल्पनेच्या आशयात हे दिसून येते की, मानवी जीवन सुखी होण्यासाठी श्रम प्रत्येकासाठी आवश्यक आहे. श्रमाशिवाय सुखी जीवन नाही. हा सर्वोदय संकल्पनेचा मुख्य संदेश आहे. त्याशिवाय मानवी जीवन सुखी होणार नाही. सर्वोदय तत्त्वज्ञान सर्वांचा उदय, सर्वांवर प्रेम, सर्वांचा विकास, सर्वांचे कल्याण साधणारी सर्वांगीण विचार संकल्पना किंवा तत्त्वज्ञान विशद करते. सत्य व अहिंसा यावर आधारलेली अहिंसात्मक निर्मिती यात अपेक्षित आहे. राज्यविरहित, वर्गविरहित, श्रमरहित, समाज किंवा नवसमाजाची निर्मिती येथे अपेक्षित आहे. हिंसा, असत्य, सत्तेची अभिलाषा यांना स्थान राहणार नाही. सर्वोदय संकल्पना राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणाला प्राधान्य देते. कारण यात शासनमुक्त समाजनिर्मिती अपेक्षित आहे. आदर्श राज्यव्यवस्था, स्वयंपूर्ण, स्वायत्त प्रत्येक खेडी - गणराज्य आपले आत्मसंरक्षण स्वबळावर करतील, समाजात शांतता, सुव्यवस्था अहिंसात्मक मार्गाने प्रस्थापित करण्यात येईल.

आर्थिक क्षेत्रात विकेंद्रीकरण करण्यात येईल. वर्गविरहित, शोषणमुक्त व समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी संपत्तीच्या विकेंद्रीकरणाला प्राधान्य दिले आहे. सर्वोदय तत्त्वज्ञानात समाजाचे सामाजिक स्वरूप हे समतेचे असेल. त्यात वर्ण, वर्ग, वंश, जात, धर्म आधारित भेद राहणार नाहीत. सर्वोदय समाजातील मनोवृत्ती अशी राहील. शरीर जगण्यास व चांगल्या स्थितीत ठेवण्यास जेवढ्या वस्तूची गरज आहे, तेवढ्याच वस्तू जवळ ठेवाव्यात. यात गरजहीनता या बाबीला प्राधान्य दिले आहे. श्रीमंतांनी गोळा केलेली जी अमाप संपत्ती आहे. त्या गरजेपेक्षा जास्त कमावलेल्या संपत्तीचा विश्वस्त म्हणून समाज उन्नतीसाठी, समाज विकासासाठी वापर करावा. ती संपत्ती ईश्वराने समाज उन्नतीसाठी आपल्याकडे दिली आहे. त्याचे विश्वस्त म्हणून कार्य करावे. समाजातील प्रत्येक सुदृढ व्यक्तीने स्वतःच्या गरजांच्या पूर्ततेसाठी आणि समाजासाठी श्रम करावे.

सूर्योदयवादी विचारसरणी ही पक्ष पद्धतीला विरोध करते. तसेच गांधीजींनी सर्वोदय समाजासाठी पंचायत राज्याची व्यवस्था असावी, असे नमूद केले आहे. म्हणजे ग्रामराज्याची संकल्पना मांडली आहे. महात्मा गांधींनी सर्वोदय संकल्पनेत अशा विविध पैलूंचा आढावा घेतलेला दिसून येतो. जेणेकरून ग्रामस्वराज्य संकल्पना, स्वयंपूर्ण, स्वायत्त,

स्वावलंबी खेडे, सत्तेचे विकेंद्रीकरण, आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण, विश्वस्त संकल्पना, पक्षविरहित लोकशाही, जेवढी गरज तेवढ्या वस्तूंची आपल्याकडे साठवण ठेवावी अशा सूचक बाबींची त्यांनी मांडणी केली आहे.

महात्मा गांधींनी सर्वोदयी संकल्पनेत व्यक्तिवादास विरोध केला आहे. त्यांनी समाजहिताला महत्त्व दिले आहे. समाजहितात व्यक्तीहित सामावलेले असते, असे ते सूचित करतात. तसेच महात्मा गांधींनी हिंसेला विरोध केला आहे. कारण सर्वोदय समाजात विशिष्ट वर्गाच्या हिताचा विचार न करता समाजातील सर्वांचे हित साधणे, हा उद्देश असल्यामुळे त्यासाठी ते कोणत्याही परिस्थितीत अहिंसात्मक तत्त्वांचे पालन करणार आहेत. तसेच सर्वोदयी तत्त्वज्ञानात नैतिक बाबींना प्राधान्य देण्यात आले आहे. नीतिमत्तेचे सर्व मानवी समूहाने पालन केले तर विश्वपातळीवर मोठ्या प्रमाणात कायापालट होण्यास वेळ लागणार नाही.

**विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण यांचे सर्वोदयी विचार**

महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा वारसा पुढे चालविण्यासाठी विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, धर्माधिकारी, पटवर्धन या विचारवंतांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहेत. विनोबा भावेंनी सर्वोदय चळवळ भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचा प्रयत्न केला आणि गाव भागात त्यांना मोठा प्रतिसादही मिळाल्याचे दिसून येते. ‘भूदान चळवळ’ ही संकल्पना देशभर विस्तारित करण्यास त्यांचे मोठे योगदान आहे. त्याचबरोबर जयप्रकाश नारायण यांनी ‘संपूर्ण क्रांती’ या संकल्पनेच्या माध्यमातून गांधीजींचे विचार अधिक चांगल्या प्रकारे रुजविण्याचे योगदान दिले. सर्व क्षेत्रात म्हणजे सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक त्यांना बदल हवा होता. यातून या महात्मा गांधींचा वारसा पुढे नेला आहे.

**सर्वोदय संकल्पनेचा सारांश**

महात्मा गांधींच्या सर्वोदय तत्त्वज्ञानात समाजाची उन्नती अहिंसात्मक मार्गाने झाली पाहिजे. त्यात कोणत्याही विघातक मार्गाने बदल त्यांना नको होता. नवीन समाजनिर्मिती बाबत कार्ल मार्क्सने वर्गविरहित समाज, धर्मविरहित समाज, राज्यविरहित समाज ही कल्पना मांडली. परंतु त्यांनी क्रांतीलाही प्राधान्य दिल्याचे दिसून येते. महात्मा गांधींना अपेक्षित असलेला सर्वोदय समाज हा हिंसा, धर्मभेद, जातभेद, स्वार्थीप्रवृत्ती यावर आधारित नसून अहिंसा, सत्य, विश्वबंधुत्व, शांततावादी समाज अभिप्रेत होता. ही संकल्पना स्वप्नाळू, काल्पनिक वाटत असली तरी समाजातील सर्व मानवी समूहांनी सद्सद्विवेकबुद्धीचा वापर केला तर अहिंसात्मक समाज अस्तित्वात येण्यास वेळ लागणार नाही. कारण आजही जगात महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान प्रेरणादायी ठरत आहे आणि ते कायम ठरणार आहे. मला चीनमधील कन्फ्युशियस या विचारवंताचा एक संदेश सांगावासा वाटतो, तो म्हणजे ‘जशास तसे.’ अर्थात ‘तुम्ही स्वतःबद्दल वाईट किंवा नुकसान होणार नाही याची काळजी घेतात. तसेच दुसऱ्याच्या बाबतीतही आपण घ्यावी.’ हा त्यातील आशय आहे आणि ते खरेही आहे. यात नीतिमत्ता दिसून येते आणि सर्व संकल्पनेतील सार हा नैतिकतेवर आधारित असल्याचे दिसते.

भारतात सर्वोदय दिवस 30 जानेवारी, 23 मार्च, 19 मे, 21 ऑक्टोबर, 17 नोव्हेंबर, 19 नोव्हेंबर अशा विविध दिवशी साजरा केला जातो. यातून स्पष्ट दिसून येते की, राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या विचारांची समाज उन्नतीसाठी आणि समाज कल्याणसाठी गरज आहे, याची शासन पातळीवर प्रामुख्याने दख्खल घेतली जात आहे. ही उल्लेखनीय अशी बाब आहे.

**संदर्भ सूची**

१. डॉ. बी. आर. जोशी, सामाजिक शास्त्रातील संज्ञा-सिद्धांताचा कोश, डायमंड पब्लिकेशन, पुणे, 2007.

२. दादा धर्माधिकारी, सर्वोदय दर्शन, ग्रामसेवा मंडळ, पवनार, 1998.

३. चोपडे किसन, भारतीय विचारवंत, विद्या प्रकाशन, औरंगाबाद, 1997.

४. जनार्दन पाण्डेय, सर्वोदय का राजनीति दर्शन, जानकी प्रकाशन, पाटना, 1979.

५. डॉ. भा. ल. भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपुर, 2003.

६. डॉ. जी. पी. नेल्ला, जैन, आधुनिक राजनीतिक निबन्ध, विश्र्वभारती पब्लिकेशन, दिल्ली, 2010.

७. प्रा. देवरे निकुंभ, आधुनिक राजकीय विचारप्रणाली, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2010.